**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, कोंकण खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (३) अन्वये झालेले व्दितीय अपिल**

**अपिल क्रमांक : के.आर-८५/२०२५**

**अपिलार्थी,श्री.किशोर रमेश जोशी,**
**मु.भुताळमान, पो.केळवा रोड,**
**ता.जि.पालघर ४०१ ४०१.**

विरुध्द

जन माहिती अधिकारी तथा सहायक आयुक्त,
प्रभाग समिती आय कार्यालय, वसई विरार शहर
महानगरपालिका, वसई, ता.वसई,
जि.पालघर ४०१ २०१.

प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा उप आयुक्त,
प्रभाग समिती आय कार्यालय, वसई विरार शहर
महानगरपालिका, वसई, ता.वसई,
जि.पालघर ४०१ २०१.

**द्वितीय अपिल अर्ज सुनावणीचा दिनांक : १६.४.२०२६**

| माहितीचा अर्ज दाखल केल्याचा दिनांक | जन माहिती अधिकारी यांच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपिल अर्ज दाखल दिनांक | प्रथम अपिल आदेश दिनांक |
|---|---|---|---|
| १५.७.२०२४ | १९.९.२०२४ | १७.८.२०२४ | १४.१०.२०२४ |

अपिलार्थी यांनी दि.७.१.२०२५ रोजीच्या अर्जान्वये "प्रथम अपिल आदेशानंतरही माहिती मिळालेली नाही." असे कारण नमूद करुन कलम १९(३) अन्वये व्दितीय अपिल अर्ज दाखल केला आहे. सदर द्वितीय अपिल अर्जात त्यांनी कोणतीही विनंती केलेली नाही.

सदर द्वितीय अपिलावर आज दिनांक १६.४.२०२६ रोजी सुनावणी घेण्यात आली.

सदर सुनावणीस अपिलार्थी उपस्थित आहेत. तथापि, जन माहिती अधिकारी अनुपस्थित आहेत.(कार्यालयाद्वारे नोटीस पाठविलेबाबतचे ट्रॅकिंग रिपोर्ट सादर करण्यात आले असून, ते नस्तीसोबत अभिलेखावर ठेवण्यात आलेले आहेत).

अपिलार्थी यांनी मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितली आहे.

*"(घर नं.७४/४ ची असेसमेंट ता.वसई, जि.पालघर वसई (तामतलाव) सुतारआळी घर नं.७४/४ या घराची असेसमेंट मला मिळावी. २. सोबत जोडत असलेल्या अर्जाच्या पोच पावतीच्या प्रकरणाच्या झेरॉक्स कॉपी मला मिळाव्यात.)"*

तद्नंतर अपिलार्थी यांनी जोडपत्र ब मध्ये "कोणत्याही प्रकारची माहिती दिली गेली नाही." असे कारण नमूद करुन प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडे कलम १९(१) अन्वये प्रथम अपिल दाखल केले.

अपिलार्थींनी दाखल केलेल्या प्रथम अपिलावर तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि.१४.१०.२०२४ रोजी सुनावणी घेऊन, "स्थळ पाहणी करून घर क्रमांक मिळवून १० दिवसांत माहिती दयावी." असा निर्णय देऊन अपिल निकाली काढले आहे.

या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांना आजच्या सुनावणीची सूचना प्राप्त झालेली नाही. सबब, त्यांना पुनश्चः सुनावणीची नोटीस काढण्यात यावी. प्रस्तुत प्रकरणी पुनश्चः सुनावणी घेण्यात येईल. यास्तव आयोग पुढील आदेश देत आहे.

**आदेश**

**प्रस्तुत प्रकरणी पुढील सुनावणी दि.१४.५.२०२६ रोजी दुपारी १२.३० वाजता घेण्यात येईल.**

**(शेखर चन्ने)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**कोंकण खंडपीठ**

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४.
दिनांक : १६ एप्रिल, २०२६